**खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे**

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

**राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे**

# प्रसिद्धी विभाग

# शैक्षणिक वर्ष : २०२४ – २५

## राष्ट्रीय सेवा योजना – विशेष हिवाळी शिबीर

### बहिरवाडीमध्ये एनसीसीच्या श्रमसंस्कार शिबिरास प्रतिसाद

**चास, ता. १७ :** बहिरवाडी (ता. खेड) येथे राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिर घेण्यात आले. यामध्ये विविध उपक्रम राबवीत परिसराच्या स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात आली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना, हुतात्मा राजगुरू महाविद्यालय यांच्या वतीने श्रमसंस्कार शिबिर बहिरवाडी येथे सोमवार (ता. ६) ते रविवार (ता. १२) दरम्यान पार पडले. सक्षम युवा आणि समर्थ भारत अभियान ही संकल्पना असलेल्या या शिबीरात १७५ विद्यार्थी सहभागी झाले होते. शिबीरात ग्रामस्वच्छता, शाळा परिसर चकाचक करणे, ठाकरवाडी, स्मशानभूमीची स्वच्छता, परिसर सुशोभीकरण करण्याबरोबरच बैलगाडा घाट, चिक्कूची बाग स्वच्छता यांसह विविध उपक्रम पार पडले.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टे, उपाध्यक्ष प्रतापराव टाकळकर, पंचायत समितीचे माजी सभापती अंकुश राक्षे यांच्या हस्ते कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. तर समारोप खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक आणि शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष हिरामण सातकर, हुतात्मा राजगुरू सोशल फौंडेशनचे अध्यक्ष बाळासाहेब सांडभोर, शिवसेना उबाठा पक्षाचे युवक अध्यक्ष मृण्मय काळे, माजी सरपंच जगन्नाथ राक्षे, प्राचार्य डॉ.. शिरीष पिंगळे यांच्या उपस्थितीत पार पडला. शिबीरात अंकुश राक्षे, अंबर टाकळकर, अविनाश वाघमारे, राजेंद्र सांडभोर, डॉ. तेजश्री रानडे, डॉ. सविता भावसार, डॉ. अशोक काकडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सरपंच वसुधा राक्षे, जगन्नाथ राक्षे, नीतेश राक्षे, बाजीराव राक्षे, डॉ. निलीमा पाटील, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य प्रा. विठ्ठल दौंडकर, डॉ. प्रभाकर जगताप, डॉ. कीर्ती नितनवरे, डॉ. सुनीता जाधव, प्रा. नीलेश बारणे, डॉ. सागर थेऊरकर, डॉ. संजय शिंदे, डॉ. दिलीप मुळूक, प्रा. मच्छिंद्र मुळूक, डॉ. योगेश वाळुंज, डॉ. गणेश घुमाळ, प्रा. रोहिणी पाटोळे, प्रा. व्ही. बी. कामठे, प्रा. ए. ए. भोगाडे यांनी परिश्रम घेतले.

दै. सकाळ

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख